**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - वेतन-२०२०/शिक्षणशास्त्र/२०२०-२१/०१/वेतनपथक, पुणे दिनांक - १२ ऑगस्ट, २०२०

प्रति,

१. प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

२. कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे मार्च - २०२० दुसरा टप्पा.**

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील माहे मार्च, २०२० या महिन्याच्या वेतन अनुदानापैकी पहिल्या टप्याचे वेतन अनुदान आपल्या वेतन खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे. माहे मार्च २०२० या महिन्याच्या पहिल्या टप्याच्या वेतन अनुदानामध्ये वर्ग १ आणि २ मधील कर्मचा-यांना ५० टक्के, वर्ग ३ मधील कर्मचा-यांना ७५ टक्के आणि वर्ग ४ मधील कर्मचा-यांना १०० टक्के वेतन अनुदान अदा केलेले आहे.

आता माहे मार्च २०२० या महिन्याच्या दुस-या टप्याचे वेतन अनुदान अदा करावयाचे आहे. त्यासाठी माहे मार्च, २०२० या महिन्याच्या वेतन अनुदानासाठी दिलेल्या सूचनाप्रमाणे वेतन देयक तयार करण्यात यावे. तसेच त्या व्यतिरिक्त खाली दिलेल्या सूचनांचेदेखील पालन करण्यात यावे -

१. जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे मार्च, २०२० मध्ये सेवेमध्ये होते परंतू सदरहू कर्मचारी आजअखेरपर्यंत सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/मयत/सेवा सोडून गेले आहेत त्यांचे माहे मार्च २०२० या महिन्याचे वेतन एचटीई सेवार्थ प्रणालीमधून तयार होत नसल्यामुळे अशा सर्व कर्मचा-यांचे माहे मार्च, २०२० या महिन्याच्या दुस-या टप्याचे वेतन ऑफलाईन पद्धतीने सादर करण्यात यावे. तसेच या कर्मचा-यांसाठी कोणत्याही वजावटी प्रस्तावीत करण्यात येऊ नयेत.

२. माहे मार्च २०२० या महिन्याच्या वेतन अनुदानाच्या पहिल्या टप्यामध्ये व्यवसाय कराची रक्कम पूर्णपणे वजावट केलेली आहे. त्यामुळे आता माहे मार्च २०२० या महिन्याच्या दुस-या टप्याच्या वेतन अनुदानामध्ये व्यवसाय कराच्या रक्कमेची कपात करण्यात येऊ नये.

३. माहे मार्च २०२० या महिन्याच्या पहिल्या टप्याचे वेतनामध्ये ज्या कर्मचा-यांचा समावेश होता त्याच कर्मचा-यांचा समावेश माहे मार्च, २०२० या महिन्याच्या दुस-या टप्याच्या वेतन अनुदानामध्ये करण्यात यावा. माहे मार्च २०२० नंतर सेवेमध्ये आलेल्या (बदली वगळता) इतर कोणत्याही कर्मचा-यांचा समावेश करण्यात येऊ नये.

४. भविष्य निर्वाह निधी आणि डी सी पी एस यांचे कपातीबाबत शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०२०/प्र.क्र.६२/२०/कोषा-प्रशा-५ दिनांक ०१.०४.२०२० अन्वये दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

५. वर्ग ४ कर्मचा-यांना १०० टक्के वेतन माहे मार्च २०२० या महिन्याच्या पहिल्या टप्यामध्येच अदा करण्यात आल्यामुळे त्या कर्मचा-यांचा समावेश माहे मार्च, २०२० च्या दुस-या टप्याच्या वेतन अनुदानामध्ये करण्यात येऊ नये.

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आणि यापूर्वी दिलेल्या सूचना विचारात घेऊन माहे मार्च, २०२० या महिन्याचे दुस-या टप्याच्या वेतन अनुदानाचे देयक **दिनांक १६ ऑगस्ट, २०२० पर्यंत या कार्यालयास इमेलद्वारे payunit@jdhepune.info या इमेल आयडीवर पाठवून एचटीई सेवार्थ प्रणालीमधून फॉरवर्ड करण्यात यावे.**

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे